जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:- sp.jalgaon@mahapolice.gov.in

# -:प्रेस नोट :-

दिनांक :- ०४/०६/२०२६

## " जळगाव वाहतुक शाखेकडुन विशेष वाहतूक मोहिमेत २७१ बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई; वाहतूक नियमांचे पालन करण्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांचे आवाहन "

===०००===

दिनांक ०३/०६/२०२६ रोजी जळगाव जिल्ह्यात सुरक्षित व शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखा, जळगाव यांनी विशेष वाहतूक अंमलबजावणी मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध प्रभावी कारवाई करण्यात आली.

**सदर कारवाईत एकूण २७१ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ₹२,०३,३००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. हेल्मेटचा वापर न करणे, सीटबेल्ट न लावणे, सिग्नलचे उल्लंघन करणे, विनापरवाना वाहन चालविणे तसेच इतर वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली.**

जिल्ह्यात वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या संकल्पनेतून विविध विशेष उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या मोहिमेमुळे वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पोहोचला आहे. यावेळी **पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, "वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. हेल्मेट व सीटबेल्टचा नियमित वापर, वेगमर्यादेचे पालन आणि वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळल्यास अनेक अपघात टाळता येऊ शकतात. सुरक्षित प्रवासासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे."** तसेच यापुढे देखिल वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरू राहणार असून विशेष तपासणी मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार आहेत.

**सदरची वाहतुक विशेष मोहिम मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, श्री. नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री संजय गायकवाड यांच्या नेतृत्वातील वाहतुक शाखेच्या ०१ अधिकारी व २३ अंमलदार यांनी उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**************************************************************************************************










1860